सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२**
**दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com**

---

**जावक क्र.महाज्योती/नागपूर/अधिछात्रवृत्ती/एम.फिल./६६०/२०२१-२२/** **दि.२२.१०.२०२१**

## महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत एम.फिल. अधिछात्रवृत्ती-२०२१ योजनेअंतर्गत तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांची यादी

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत एम.फिल. अधिछात्रवृत्ती-२०२१ योजनेअंतर्गत २०० उमेदवारांना अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. प्रत्यक्षात २०० पेक्षा कमी अर्ज प्राप्त झालेले आहेत, अर्ज केलेल्या उमेदवारांची दि.११ सप्टेंबर २०२१ रोजी सर्व आवश्यक कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केल्यानुसार पुढीलप्रमाणे पात्र व अपात्र उमेदवारांच्या यादीस दि.१६ ऑक्टोबर २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार एम.फिल. अधिछात्रवृत्ती-२०२१ योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांमधून तात्पुरती निवड यादी पुढीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहे. या निवडयादी बाबत आपले काही आक्षेप असतील तर दि.०२ नोव्हेंबर २०२१, दु.५.०० वाजेपर्यंत fellowshipmahajyoti@gmail.com या मेलवर पाठवावे, मुदतीनंतर प्राप्त आक्षेप व माहिती स्वीकारली जाणार नाही.

सदर निवड ही उमेदवाराने कोणताही रोजगार/स्वयंरोजगार करीत नसल्याबाबत व कोणतीही इतर अधिछात्रवृत्ती मिळत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केल्याच्या आधारावर केलेली आहे, पुढील काळात निवड झालेला कोणताही उमेदवार हा रोजगार/स्वयंरोजगार करीत असल्याबाबत किंवा कोणतीही इतर अधिछात्रवृत्ती मिळत असल्याबाबत माहिती या कार्यालयास प्राप्त झाल्यास त्या उमेदवाराकडून अधिछात्रवृत्तीची रक्कम वसूल करून त्याविरोधात फसवणुकीचा फौजदारी दावा दाखल करण्यात येईल, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

ज्या उमेदवारांची निवड झालेली आहे, त्या उमेदवारांना महाज्योती, नागपूर मार्फत पुढील काळात मेलद्वारे पाठविण्यात येणारे प्रपत्र मुदतीत भरून द्यावे.

व्यवस्थापकीय संचालक,<br>
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व<br>
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर.